
# सलील चौधरी - भाग १



"येणाऱ्या काळातील रसिक लोकांच्या रूचीनुसार संगीतरचनेतही वेळोवेळी फेरबदल होत असतात आणि त्यांतून रसिकांचे मनोरंजन होत असते. असे केले नाही तर प्रगती होणार नाही. परंतु माझ्या पूर्वजांनी दिलेल्या खजिन्यामुळेच मला पुढे जाण्याची स्फूर्ती मिळते हेही विसरून चालणार नाही." - हे आहे संगीतकार सलील चौधरी यांचे मनोगत.

या दिग्गज संगीतकाराचा जन्म बंगालमधील कलकत्त्याच्या थोड्याशा दक्षिणेकडील सोनारपूर, २४ परगणे, येथे १९ नोव्हेंबर १९२३ रोजी झाला. त्यांचे वडील ग्यानेन्द्र चौधरी हे पेशाने डॉक्टर पण मनाने संगीतप्रेमी होते. घरी असताना ते नेहमीच वेस्टर्न क्लासिकल सिंफनीज आणि त्याबरोबर बंगाल आणि आसाम मधील लोकसंगीतही तेवढ्याच आवडीने ऐकत. त्यामुळे घर आणि आसमंत ह्याच संगीताच्या सुरांनी भारलेले असे. या संगीतामुळे कळत नकळत छोट्या सलीलच्या मनावर त्याचा चांगलाच परिणाम होत असे आणि वाद्यवृंद आणि वाद्ये ह्या दोहोंबाबतीत, दोन प्रकारच्या गाण्यांत जाणवणारा फरकही त्यांच्या लक्षात येत असे. अशा प्रकारची माहिती मिळाल्यामुळेच भविष्यकाळात संगीतरचना करताना त्यांनी ह्या दोन्ही पध्दतींचा मेळ साधून उत्तमोत्तम गाणी तयार केली.

त्यांच्या घरात एक पियानोसुध्दा होता आणि लहान वयातच सुरांची जाण आलेल्या ह्या छोट्या मुलाला तो उत्तम प्रकारे वाजवणे हे फारसे कठीण काम नव्हते. तो मुरली वाजवायलाही शिकला आणि त्याचे वडील ज्या चहाच्या मळ्यात डॉक्टर म्हणून काम करीत तेथे बऱ्याच वेळा जाऊन तो मुरली वाजवित असे. ८ वर्षाच्या वयातच सलील अव्वल दर्जाचा मुरलीवादक झाला. आता तो गाणेही म्हणू लागला होता. ह्या सर्वाच्या भरीस भर म्हणून आणखी एक गोष्ट घडली. त्याच्या निखिल नावाच्या मोठ्या भावाने 'मीलन परिषद' नावाचा एक संगीतवादनाचा ग्रुप तयार केला होता. हा ग्रुप सादर करीत असलेल्या कार्यक्रमांचाही त्याला उपयोग होत असे. तसेच प्रोत्साहनही मिळत असे. सलीलचा संगीताकडे असलेला ओढा पाहून त्याच्या वडिलांनी त्याला शास्त्रीय संगीत आणि लोकगीते शिकवण्यास सुरुवात केली.

<u>जनतेच्या क्षोभाच्या अशांततेचा काळ -</u>

सलीलचे शालेय शिक्षण पूर्ण होत असतानाच सभोवार अशांततेचे वातावरण होते. दुसरे महायुध्द सुरू झाले होते आणि बंगालमध्ये मोठा दुष्काळही पडला होता. ब्रिटिशांविरोधात लोकांमध्ये खूपच असंतोष होता आणि सलीलचा ज्या परिचित चहाच्या मळ्यात वावर असे तेथील जुलुम जबरदस्ती सहन करणारे कामगार आणि एकंदरीतच आसपासची जनता दारिद्र्याने गांजलेली होती. सोनारपूरपासून जवळजवळ ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या कलकत्ता येथील शाळेत सलीलचे शिक्षण झाले. त्यामुळे छोट्याशा गावातील आपल्या घरापासून दूर असलेल्या, मोठ्या शहरातील शाळेपर्यंतचा प्रवास त्याला रोज करावा लागत असे. आणि त्यामुळे या प्रवासात, सभोवती असलेल्या असंतोषाचे उघड सत्य त्याला चांगलेच जाणावत असे. अशा परिस्थितीने फारच बेचैन असलेल्या सलीलने, कामगारांचे गट, तसेच विद्यार्थ्यांचे निषेध गट यांमध्ये भाग घेण्यास सुरुवात केली. थोड्या काळासाठी त्याने आर्मीमध्येही प्रवेश घेतला. एकदा त्याने तेथे एक अशी गोष्ट पाहिली की त्याला धक्काच बसला. दुष्काळामुळे कित्येक गरीब लोकांना खायला अन्न मिळत नसे आणि एकदा अशा काळात, लष्कराच्या गाड्या सुखरुपपणे जाण्यासाठी घसरणीच्या रस्त्यावर अन्नधान्याची पोती ओतण्यात आली. हे दृष्य पाहून तो अवाकच झाला. अशा प्रकारच्या अन्यायकारक गोष्टींमुळे त्याच्या काव्यप्रतिभेला सतत चालना मिळत असे. सभोवतालच्या अशा अन्यायकारक परिस्थितीमुळे त्याने कम्युनिस्ट चळवळीत स्वत:ला झोकून दिले. आर्थिकदृष्ट्या समतोल समाज आणि उद्याची सोनेरी सकाळ देण्याचे कम्युनिस्ट चळवळीचे ध्येय होते. अर्थातच या विचाराने भारावून त्याने शेतीवाडीतून प्रवास करीत, शेतकऱ्यांचा स्नेह संपादन करीत, त्यांच्या सोबत राहून त्यांच्यासाठी बंगालीतून गाणी लिहिली आणि त्यांना गाणी म्हणूनही दाखविली. त्यांच्या बहुसंख्य गाण्यांतून उद्याची आशा आणि धैर्य यांसाठी प्रोत्साहन असे. 'इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन' मध्ये मुरलीवादक म्हणून काम

करताना त्यांनी अशा प्रकारच्या बऱ्याच गोष्टी केल्या आणि त्यानंतर कम्युनिस्ट पार्टीसाठीही काम केले.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com